नियमित दिवाणी दावा क्रमांक १४६/१२.
रामदास -वि.- कुसुम वगैरे

## निशांणी क्रमांक ५ वरील आदेश

(दिनांक ०७.०३.२०१५)

१. जाहीरनामा, कायमच्या मनाई हुकुम, आदेशात्मक मनाई हुकुम व वादग्रस्त खरेदीखते रद्द होवून मिळण्यासाठीच्या दाव्यात वादी, रामदास किसन गजभियेने प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी सदर दाव्याचा अंतीम निकाल लागे पावेतो मौजे भामेवाडा, ता. कुही येथील प.ह.न. ५ मधील गट क्र. २०८/१ मधील ० हे.७६ आर. जमीन या दावा मिळकतीत विक्री अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करून त्यात त्रयस्थाचे हितसंबंध निर्माण करू नये तसेच सदर दावा मिळकतीवरील वादीच्या ताब्यास हरकत अडथळा करू नये असा तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यासाठी सदरचा अर्ज दिवाणी प्रकीया सहितेच्या क्र.३९ नियम १ प्रमाणे दाखल केलेला असुन, असे कथन केलेले आहे की, दावा मिळकत त्याने श्री धनराज जयवंत चव्हान याचेकडून दि.१६.४.१९९३ रोजी पंजीकृत खरेदीखताद्वारे विकत घेतलेली असुन, तेव्हापासून मालक या नात्याने दावा मिळकत तो वहीती करीत आहे. प्रतिवादींचा सदर दावा मिळकतीशी काही एक संबंध नाही. मात्र, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी पटवा-याशी संगनमत करून बेकायदेशीरपणे प्रतिवादी क्र.१ च्या नावाची फेरफार नोंद करून घेतली. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ च्या लाभात व अधिक गुंतागुंत निर्माण करण्यासाठी प्रतिवादी क्र.२ ने प्रतिवादी क्र.३ च्या लाभात पंजीकृत खरेदीखत बेकायदेशीरपणे करून दिलेले आहे. त्या अनुषंगाने त्यांच्या नावे फेरफार नोंद देखील घेण्यात आलेली आहे. फेरफार नोंदीस वादीने राजस्व अधिका-याकडे आक्षेप देखील घेतला. परंतु त्याचे अपील फेटाळण्यात आले. त्याविरूध्द त्याने

नागपूर येथील मा.अतिरिक्त जिल्हाधिकारी साहेब यांचेकडे अपील याचीका दाखल केलेली असुन, ती प्रलंबित आहे. सबब, वादीने सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी नि.क्र.१७ प्रमाणे आपला लेखी खुलासा दाखल करून सदर अर्जास तीव्र आक्षेप घेतलेला आहे. दावा मिळकतीवरील वादीचा कथीत मालकी हक्क व ताबा त्याचप्रमाणे त्याच्या पुर्वीचा कथीत मालक श्री धनराज जयवंत चव्हाण याचा देखील मालकी हक्क प्रतिवादींनी स्पष्टपणे नाकबुल केलेला असुन, असे प्रतिकथन केलेले आहे की, धनराज चव्हाण हा प्रतिवादी क्र.१ चा सख्खा भाउ आहे. राजस्व अभिलेखानुसार दावा मिळकत पुर्वी भदु बाला गजभिये यांच्या मालकीची होती. त्या व्यतिरिक्त त्यांच्याकडे अन्य मिळकत देखील होती. त्यांच्या मृत्यूनंतर वारस म्हणून तुळशिराम व किसन यांना समान वाटणी करून प्रत्येकी सहा एकर जमीन देण्यात आली. तुळशिरामच्या मृत्यूनंतर त्याचे वारस असलेल्या तुळसाबाई, यमुनाबाई व अनुसयाबाई यांना प्रत्येकी दोन एकर जमीन देण्यात आली व त्यानंतर तुळसाबाईच्या मृत्यूनंतर तीचे वारस असलेल्या प्रतिवादी क्र.१ कुसुम, तीचा भाउ धनराज चव्हाण व तीच्या बहीनी शेवंताबाई व मंजुळा यांना प्रत्येकी १९ आर जमीन देण्यात आली. प्रतिवादी क्र.१ ने शेवंताबाई व मंजुळाबाईच्या हिश्यावर देण्यात आलेली ३८ आर जमीन खरेदी केली. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ कडे ५७ आर जमीन मालकी हक्काने असुन, धनराज चव्हाण यास केवळ १९ आर जमीन मिळालेली आहे. त्यामुळे त्यास वादी म्हणत असल्याप्रमाणे ७६ आर जमीन विकण्याचा कोणताही अधिकार कधीही नव्हता व नाही. सबब, त्यांच्या मते वादीच्या लाभातील कथीत खरेदीखत बेकायदेशीर ठरते. सबब, त्यांनी सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

३. मी वादीतर्फे वकिल श्री किंदर्ले यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.१ ते ३ सतत गैरहजर राहत असुन, त्यांचेतर्फे त्यांचे वकिल देखील उपस्थित नाहीत. सबब, त्यांच्या युक्तीवादाशिवाय सदर अर्जाची कार्यवाही पुढे चालविण्याचा आदेश दि.७.१.२०१५ रोजी पारीत करण्यात आला. मात्र, त्यानंतर आजपावेतो सुध्दा त्यांच्यातर्फे कोणीही हजर झाले नाही. मी अभिलेखाचे वाचन केले. सदर अर्जाच्या न्यायानिर्णयासाठी माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित झालेले असुन त्यांचे निष्कर्ष कारणमिमासेसह मी खालीलप्रमाणे नमुद करीत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीस प्रथमदर्शनी प्रकरण असल्याचे त्याने सिध्द केले आहे काय? | .... नकारार्थी |
| २. | तात्पुरता मनाई हुकूम नामंजुर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय? | .... नकारार्थी |
| ३. | न्यायाचे समतोलत्व वादीच्या लाभात आहे काय? | ... नकारार्थी |
| ४. | आदेश काय? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ साठी (प्रथम दर्शनी प्रकरण)**

४. वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आलेला आहे की, त्याने योग्य व पुरेसा प्रथमदर्शनी पुरावा दाखल करून, त्याला प्रथम दर्शनी प्रकरण असल्याचे व प्रतिवादींनी दावा मिळकती विकण्याचा प्रयत्न चालविला असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केलेले असुन, तो विनंती केल्याप्रमाणे तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यास पात्र ठरतो. वादीने आपल्या अर्जाच्या पुष्टयर्थ त्याचे

लाभातील पंजीकृत खरेदीखताची प्रत, प्रतिवादी क्र.२ च्या लाभातील वादग्रस्त खरेदीखताची प्रत, प्रतिवादी क्र.३ च्या लाभातील वादग्रस्त खरेदीखताची प्रत, दावा मिळकतीच्या सात बारा उता–याची प्रत ईत्यादी दस्तांवर भिस्त ठेवण्यात आलेली आहे. प्रतिवादींतर्फे कोणताही दस्त अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही.

५. उभयपक्षांच्या वादकथन व अभिलेखावर दाखल पुराव्याचे वाचन केले असता, असे दिसून येते की, श्री धनराज जयवंत चव्हाण याचेकडून वादीने दावा मिळकत विकत घेतली असल्याचे वादीने वादकथन केलेले आहे. सदर बाब प्रतिवादींनी स्पष्टपणे नाकबुल करून, श्री धनराज चव्हाण यास दावा मिळकत विकण्याचा अधिकार नसल्याचे व त्यास केवळ १९ आर जमीन वाटणी मिळाल्याचे प्रतिकथन केलेले आहे. येथे ही बाब विचारात घेणे विशेष महत्वपुर्ण आहे की, प्रतिवादी क्र.१ च्या लाभातील फेरफार नोंदीस आक्षेप घेण्यासंदर्भात वादीने दाखल केलेली राजस्व अपील याचीका खारीज करण्यात आली असल्याची बाब वादीस मान्य आहे. त्यामुळे वादीच्या लाभात जरी पंजीकृत खरेदीखत असले, तरी त्याने प्रथमदर्शनी सदर बाब सिध्द करणे आवश्यक ठरते की, श्री धनराज चव्हाण यास संपुर्ण दावा मिळकतीवर मालकी हक्क होता व त्या हक्काने त्याने वादीस सदर मिळकत विकलेली आहे. अभिलेखावरून दिसून येते की, वादीने श्री धनराज चव्हाण याचा मालकी हक्क दर्शविणारा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. सदर बाब वादी राजस्व नोंदी दाखल करून सहजपणे सिध्द करू शकला असता. परंतु त्याने तसे केलेले नाही. या बाबत कोणतेही स्पष्टीकरण वादीतर्फे देण्यात आलेले नाही. त्यावरून प्रथमदर्शनी वादीचा संपुर्ण मिळकतीवर ताबा असल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रथमदर्शनी श्री धनराज चव्हाण यास संपुर्ण दावा मिळकत विकण्याचा अधिकार होता

काय याबाबत देखील रास्त शंका निर्माण होते. सबब, मी या निष्कर्षावर आलेलो आहे की, आपल्यास प्रथमदर्शनी प्रकरण असल्याचे सिध्द करण्यास वादीस अपयश आलेले आहे. सबब, मी मुद्‌दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्‌दा क्र.२ व ३ बाबत** (अपरिमीत नुकसान व न्यायाचे समतोलत्व)

६. मुद्‌दा क्र.१ वरील नकारार्थी निष्कर्षाच्या अनुषंगाने वादीचे अपरिमीत नुकसान होण्याचा किंवा न्यायाचे समतोलत्व त्याच्या लाभात असण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सबब, मी मुद्‌दा क्र.२ व ३ चा निष्कर्ष देखील नकारार्थी नोंदवित आहे व मुद्‌दा क्र.४ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी क्रमांक ५ वरील अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

२. दोन्ही पक्षांनी आदेशाची नोंद घ्यावी.

३. आदेश खुल्या न्यायदान कक्षात सांगितला व घोषीत केला.

कुही
दिनांक : ०७.०३.२०१५.

(एस. आर. निकम)
सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कुही.